# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## ८९ वे नाटय संमेलन २००९. बीड

अखिल भारतीय मराठी नाटय परिषदेच्या विद्यमाने बीड येथे ८९ वे अखिल भारतीय मराठी नाटय संमेलन शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी ते रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २००९ या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आले.

## १३ फेब्रुवारी २००९

नाटय संमेलनाच्या पूर्वसंध्याचे कार्यक्रम शुक्रवार दिनांक १३ फेब्रुवारी २००९ रोजी सायं. ६.०० वा. कै. केशरबाई क्षीरसागर नाटयनगरीतील कै. राम मुकादम रंगमंचावरून सादर करण्यात आले. पूर्वसंध्येत स्थानिक कलावंतानी शास्त्रीय पखवाज वादन, उपशास्त्रीय सुगम गायन, उपशास्त्रीय नाटयगीत गायन, शास्त्रीय नृत्य, घागर—परात—समई नृत्य, भारूड, नक्कल वासुदेव नृत्य, अराधी नृत्य गीत, परिक्षक मुकनाटय हे कार्यक्रम करण्यात आले.

## १४ फेब्रुवारी २००९

या वर्षीचे ८९ वे अ.भा. मराठी नाटयसंमेलन शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २००९ व रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २००९ रोजी बीड येथे ज्येष्ठ व श्रेष्ठ अभिनेते श्री. रामदास कामत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. प्रथेप्रमाणे सकाळी निघालेली नाटयदिंडी अनेक नामवंत कलाकारांसह बीड मधील हजारोंच्या संख्येने आलेल्या रसिकांमुळे भव्य अशीच होती. नाटयदिंडीच्या अग्रभागी असलेले घोडेस्वार, पारंपारिक वेशात आलेल्या शाळकरी चिमुरड्या मुली, रस्त्या—रस्त्यांवर काढलेल्या आकर्षक रांगोळया आणि अनेक मान्यवर, नामवंत कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे ही दिंडी न भूतो न भविष्यात अशीच झाली होती. नाटयदिंडी कै. केशरबाई क्षीरसागर नाटयनगरीतील आद्यकवी मुकुंदराज रंगमंच्याच्या व्यासपीठाकडे येऊन पोहोचल्यावर सकाळी ११.०० वा. नाटयसंमेलनाच्या उद्घाटन सोहळयाला सुरुवात झाली. निलम शिर्के आणि अतुल परचुरे यांच्या निवेदनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. बीड येथील स्थानिक कलावंतानी सादर केलेल्या देशभक्तीपर नृत्य दर्शनानंतर उद्घाटक मा. मुख्यमंत्री ना.श्री. अशोकराव चव्हाण, प्रमुख पाहुणे मा.ना.श्री. बबनराव पाचपुते, मा.ना.श्रीमती विमलताई मुंदडा, सांस्कृतिक राज्यमंत्री मा.ना. श्री. सुरेश वरपूडकर, स्वागताध्यक्ष मा.श्री. जयदत्त क्षीरसागर, कार्याध्यक्ष तथा बीडचे नगराध्यक्ष डॉ. भारतभूषण क्षीरसागर, नाटय परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी, नाटयसंमेलनाचे मावळते अध्यक्ष श्री. रमेश देव, नियोजित अध्यक्ष श्री. रामदास कामत आदी मान्यवरांनी नटराज पूजन व दीप प्रज्वलित करून संमेलनाचे उद्घाटन केले.